जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०१०/२०२३
## दि.०४/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १५०५/२०२३,भादविक ३०७,५०४,५०६,३४,क्रिमीनल लॉ अमेडमेन्ट ॲक्ट कलम ०७, आर्म ॲक्ट कलम ४(२५) |
| **फिर्यादी** | हनुमंत हिवराळे,वय-२८ वर्षे,रा.पिरवाडी,महंमदवाडी,पुणे |
| **आरोपीत** | अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०/२०२३ रोजी रात्रौ ०१/०० वा. एस.डी.बार ॲण्ड रेस्टॉरन्ट समोर महमदवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे एस.डी.बार ॲण्ड रेस्टॉरन्ट,बिटॉस हॉटेल शेजारी पानाचे दुकान रोडच्या कडेला आहे. फिर्यादी हे त्यांचे पानाचे दुकान बंद करुन रेस्टॉरन्टचे बाहेर नमुद ठिकाणी थांबले असता,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांना मनोज साळवी कोठे आहे,आमचे त्याचेकडे काम आहे अशी विचारणा केली. त्यावेळी फिर्यादी यांनी माहित नसल्याचे सांगताच,त्याचा त्यांना राग आल्याने,त्यांनी फिर्यादी सोबत वाद घालुन,धारधार हत्याराने तुला आता संपवतो असे म्हणुन फिर्यादीचे पाठीमध्ये मारून जखमी केले. त्यानंतर जमील पठाण हे भांडण सोडवण्यासाठी पुढे आले असता,त्यांचेही डावे कानावर,दंडावर व मनगटावर मारुन गंभीर जखमी केले. तसेच हॉटेल मॅनेंजर विकास गोमसाळे याचे पाठीवर धारधार हत्याराने मारुन जखमी करुन,त्यास शिवीगाळ व आरडा-ओरडा करून,सदर परिसरात दहशत निर्माण केली. तसेच फिर्यादी, जमील पठाण व विकास गोमसाळे यांना धारधार हत्याराने वार करुन,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, अनिल सुरवसे ९८२३०२७३६७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४८६/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२५ वर्षे,रा.रामटेकडी,वानवडी,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०९/२०२३ रोजी रात्रौ १२/३० वा.फातिमानगर बस स्टॉप जवळ,वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणाहुन पायी रस्ता क्रॉस करीत असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील मोबाईल १०,०००/- रू किचा हिसका मारून जबरी चोरी करून नेला आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. माया गावडे ८५९१४१५०२८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**